# हळद, आले पिकांतील अन्नद्रव्ये व्यवस्थापन

» पान १० वरून

## सिंचन व्यवस्थापन

- पावसाळ्यात शेतात पावसाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसामध्ये १० ते १२ दिवसांचा खंड पडल्यास पिकास पाणी द्यावे.
- आधुनिक सिंचन पद्धतीने पाणी द्यावयाचे झाल्यास तुषार सिंचन, ठिबक सिंचन यासारख्या पद्धतीचा अवलंब करावा.
- गादीवाफा पद्धतीने आले लागवड केल्यानंतर एका गादीवाफ्यावर दोन ठिबक सिंचनाच्या नळ्या टाकाव्यात. साधारण प्रति तास २ लिटर इतका पाण्याचा विसर्ग होण्याऱ्या तोट्या बसवाव्यात. जमिनीच्या मगदुरानुसार ठिबक संच सुरुवातीस अर्धा ते पाऊण तास सकाळी, संध्याकाळ आणि त्यानंतर एक ते दीड तास चालवावा.

**फर्टिगेशनद्वारे द्यावयाची मात्रा :** **मध्यम काळ्या जमिनीमध्ये आले पिकाच्या अधिक उत्पादनासाठी आणि जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी चांगले कुजलेले शेणखत २५ टन आणि शिफारशीत खतमात्रेच्या ७५ टक्के मात्रा (९०:५७:५७) अनुक्रमे नत्र, स्फुरद आणि पालाश प्रति हेक्टरी प्रमाणे द्यावे. विद्राव्य खते ठिबक सिंचनामधून द्यावी.**

| वाढीची अवस्था | लागवडीपासूनचा कालावधी | अन्नद्रव्ये | मात्रा (किलो प्रति एकर) | नत्र (किलो प्रति एकर) | स्फुरद (किलो प्रति एकर) | पालाश (किलो प्रति एकर) |
|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीपासून १५ दिवसांनी | २ आठवडे | १९-१९-१९, युरिया, फॉस्फेरीक ॲसिड | १५.८ किलो, ४ किलो, ३.५ किलो | ४.८ | ६ | ३ |
| शाकीय वाढ | १० आठवडे | १९-१९-१९, युरिया, फॉस्फेरीक ॲसिड | ३१.६ किलो, ३९.२ किलो, ३.५ किलो | २४ | ९ | ६ |
| कंद भरणे | १२ आठवडे | १९-१९-१९, युरिया | ४७.४ किलो, ६.५ किलो | १२ | ९ | ९ |
| कंद भरणे | ६ आठवडे | १९-१९-१९, युरिया, ०-०-५० | ३१.६ किलो, २.६ किलो, १२ किलो | ७.२ | ६ | १२ |
| | | | **एकूण** | ४८ | ३० | ३० |

(टीप : माती परीक्षण अहवालानुसार विद्राव्य रासायनिक खतांची मात्रा ठिबक सिंचनातून दिल्यास पिकाची वाढ चांगली होऊन खतांची बचत होते.)

**- डॉ. मनोज माळी ९४०३७ ७३६१४ (लेखक हळद संशोधन योजना, कसबे डिग्रज येथे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)**